
लेखमालिका : खेळ अंकांचा



# भाग्यांक ८
# शनि प्रभावित अंक ८

– मनिषा राक्षे (अंकज्योतिष सल्लागार)

**अंकशास्त्र हे अतिप्राचीन आणि गहन शास्त्र आहे. त्याचा योग्य उपयोग करण्यासाठी त्याचा व्यवस्थित अभ्यास व दांडगा अनुभव आवश्यक आहे. काही लोक अंकशास्त्राचा जुजबी अभ्यास करुन त्याचा दैनंदिन व्यवहारात प्रयोग करतात. काहीवेळा त्याचा फायदाही होतो. परंतु अर्धवट ज्ञान केव्हाही घातकच ठरते. अधिक माहितीसाठी तज्ज्ञ व्यक्तिंचा सल्ला घेणे फायदेशीर ठरते.**

१ ते ९ या पैकी प्रत्येक अंकाचं स्वतःचं एक व्यक्तिमत्त्व असतं आणि काही खास गुणधर्म असतात. यातील प्रत्येक अंकावर नवग्रहांमधील एका विशिष्ट ग्रहाचा प्रभाव असतो आणि त्या ग्रहाचे गुणधर्म त्या विशिष्ट अंकाला लाभलेले असतात. आज आपण 'शनिप्रभावित आठ' या अंकाबद्दल लाभलेले असतात. आज आपण 'शनिप्रभावित आठ' या अंकाबद्दल जाणून घेणार आहोत. ज्यांची जन्मतारीख ८,१७,२६ या त्यांचा भाग्यांक आठ असून राशीस्वामी शनि आहे. 'संघर्ष' हा आठचा मूलभूत गुणधर्म आहे. इंग्रजी आठ या आकड्यामध्ये एकावर एक दोन वर्तुळ असतात. यातल्या कोणत्या वर्तुळामध्ये तुम्ही आहात त्यावर तुमची साधारण जीवनशैली ठरते. खालच्या वर्तुळात असलेल्या ८ अंकाच्या व्यक्ती या आर्थिक अडचणीत असतात. सुखसुविधा, आराम रोजच्या दैनंदिन जीवनात अडचण. वरच्या वर्तुळातल्या व्यक्ती आर्थिक दृष्टीनं समृद्ध असतात. त्यांच्याकडे भौतिकसुबत्ता असते. पण तरीसुदधा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींचा 'संघर्ष' चुकत नाही. तसे तर जीवनातले खाचखळगे आपल्या सगळ्यांनाच अनुभवाने लागतात, पण आठ अंकाच्या व्यक्तींना इतरांच्या तुलनेत समस्या, अडचणी, साध्या साध्या कामात उशीर विलंब, नकार, निराशा व अवहेलना या ज़ास्त प्रमाणात असतात, एवढे असूनही १ ते ९ अंकापैकी ८ अंकच जास्तीत जास्त बुद्धिमान असतो असे मला वाटते. कारण त्यांच्यावर शनिमहाराजांची कृपादृष्टी असते. ह्या व्यक्ती कडक

शिस्तीचे भोक्ते, निश्चयी, स्थिर व कर्तव्यतत्पर असतात. तुम्ही उत्कृष्ट संघटक व विचारी आहात तुमचे विचार विधायक व क्रियाशील असतात. शांतता व एकांत ह्या गोष्टींची आवड असते. निसर्गसौंदर्य व फुले ह्याबद्दल ओठ असते.

शनि हा ग्रह समतोल स्वभावाचा असून दोन्ही बाजूंचा विचार करणारा आहे. त्यामुळे निर्णय घेण्यापूर्वी तुम्ही सखोल विचार करून निर्णय घेता. शनीचा जास्त प्रमाणात प्रभाव असल्याने खिन्नता व निराशा यात अनेक वेळा डुबून बसता. इतर लोकांच्यापेक्षा तुम्ही अधिक धोरणी व हुशार आहात. महत्त्वाकांक्षी असून सतत कामात मग्न राहणे तुम्हाला प्रिय असते. इष्ट गोष्ट प्राप्त करण्यासाठी श्रम घेण्याची तुमची तयारी असते. तुमची वृत्ती संशयखोर असून तुमच्यात चिवटपणा आहे. तुम्ही कार्यशील, कार्यक्षम व अधिकार गाजवणारे आहात. तुमच्याबद्दल काहीवेळा गैरसमज निर्माण होतात. समाजात जरी वावरत असलात तरी एकटेपणाची जाणीव असते. गरीब व दुबळ्या लोकांबद्दल आदर असतो. जन्मत:च उत्तम व्यवस्थापक असल्यामुळे इतरांकडून काम करून घेणे जमते. न्याय, योग्य गोष्टीबद्दल आदर व त्यासाठी मोबदला देण्यास तुम्ही तयार असता.

जीवनातील विविध क्षेत्रात यागेय तऱ्हेने व्यवस्थापन करण्यासाठी लागणारा अधिकार, वचक व जोर ह्या गोष्टी तुमच्यात भरपूर आहेत. जीवनात आपण अधिकार गाजवावा ह्याबद्दल तुम्हाला आसक्ती असते. तुमच्या दीर्घोदयोगाने तुम्ही इतरांना उदाहरण घालून देता. परंतु त्यामुळे तुमचे काम इतरांकडून होण्यता तुम्हाला अडचणी येतील. अशा प्रसंगी तुम्ही कष्टी होता व तेवढ्यापुरते का होईना तुम्हाला नैराश्य येते व जीवनात काही अर्थ नाही ह्या विचारांचा पगडा बसतो अशावेळी समाजापासून दूर न जाता मित्रमंडळीत मिसळणे तुमच्या हिताचे ठरेल.

तसेच तुमच्या प्रकृतीच्या दोषाचे मूळ कारण म्हणजे नैराश्य व चिडखोरपणा पाय, कान, दातांचे विकार संधिवात ह्यांपासून तुम्हाला त्रास संभवतो. पित्तकारक प्रकृतीमुळे दीर्घकालीन नैराश्याचा त्रास होतो. गुडघेदुखी, मांड्या दुखणे, मणक्याचे दुखणे या आजारांपासून काळजी घेणे हिताचे ठरते.

तुमचा खरा उत्कर्ष, भाग्योदय वयाच्या पस्तीशीनंतर सुरु होतो. ३५ वर्ष खस्ता काढल्यानंतर पुढचं आयुष्य संपन्न सुखी असतं. कारण शनीचं वैशिष्ट्ये म्हणजे तो कठिण परीक्षा घेतो आणि मग त्याची भरपाईही करतो. १ ते ९ अंकापैकी ८ या अंकाला स्वत:चा अंक वापरता येत नाही. भाग्यांक ८ च्या व्यक्तींनी ३,५,७, या अंकाचा वापर करावा. तुमच्या आयुष्यात तुमचा अंक वारंवार येतो. जोडीदाराचा अंक, मुलांचा अंक, बँक, अकाऊंट नंबर, घर नंतर, फोन नंबर, गाडी नंबर, तारखा यत्ती येत राहतात. पण त्यांनी हे अंक प्रकर्षाने टाळले पाहिजेत. कित्येकदा या लोकांना त्यांनी न कलेल्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरवलं जातं, चुकीचे आरोप केले जातात आणि या लोकांबद्दल गैरसमज पसरतात. म्हणून ८ अंकाच्या व्यक्तींनी शक्यतोवर वादविवाद, कोर्टाचे खटले आणि भागीदारी यापासून दूर राहावं. या लोकांना नेहमी विरोध सहन करावा लागतो. त्यांना उपजतच संघर्ष करण्याची ताकदही इतरांपेक्षा जास्त मिळालेली असते. त्याचा त्यांनी फायदा करून घ्यायला हवा आणि स्वत:ला खंबीर बनवायला हवं या लोकांकडे धीर, निश्चय निर्णयक्षमता आणि महत्त्वाकांक्षा ही इतरांपेक्षा जास्त असते.

८ अंकाच्या काही प्रसिद्ध व्यक्ती आपले पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग शिल्पाशेट्टी, आशा भोसले, रविना टंडन, सौरभ गांगुली.

शुभतारखा : ३,५,७,१२,१४, १६,२१,२३,२५ या तारखांचा व्यवहारात वापर करावा.

शुभरंग : गडद निळा, करडा, जांभळा, काळा या व्यक्तींनी लाल रंग टाळावा.

आजवर मी आठ अंकाच्या व्यक्तींचे खूप काम केले. त्यांच्या नावात बदल करून त्या व्यक्ती त्यांच्या इप्सित ध्येयापर्यंत पोहचल्यात अशी ८ अंकांची अनेक उदाहरणे मला देता येतील. तुम्ही सुद्धा या संधीचा लाभ घ्यावा व आपल्या आयुष्यातील मार्ग सुकर करावा. पुढील लेखात वाचकांना नं.९ बद्दल माहिती वाचावयास मिळेल.

मनिषा राक्षे
(अंकज्योतिष सल्लागार)
५३७, शुक्रवार पेठ,
पुणे -२
मो.नं. ९८२२०५९४०६